**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः08.04.2026** **वारः बुधवार**

---

1. काही अटींवर दोन आठवड्यांसाठी युद्धबंदी करण्याच्या प्रस्तावावर अमेरिका-इराणदरम्यान बोलणी सुरू
2. अध्यक्ष ट्रम्प यांच्या युध्दबंदीच्या प्रस्तावानंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत घसरण
3. रिझर्व बँक आज द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर करणार
4. आसाम, केरलम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार थंडावला, उद्या एकाच टप्प्यात मतदान आणि
5. विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत, पलक गुलिया आणि मुकेश नेलावल्ली यांना 10 मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात सुवर्णपदक

**ट्रम्प-युद्धबंदी**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांच्या वाहतुकीस मुभा दिल्यास इराणसोबत दोन आठवडे युद्धबंदी करण्याचा प्रस्ताव अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांनी आपली लष्करी उद्दीष्टं अगोदरच साध्य झाली असल्याचा दावा करत हा संघर्ष यापूर्वीच मिटवण्याच्या जवळ पोहोचला होता, असं समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासह आपल्या इतर काही अटी इराणनं मान्य न केल्यास या देशातील ऊर्जा प्रकल्प, पुलांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करून अत्यंत विनाशकारी हल्ले करण्यात येतील असा

इशारा ट्रम्प यांनी दिला होता. त्यासाठी त्यांनी इराणला भारतीय प्रमाण वेळेनुसार पहाटे साडेपाच वाजेपर्यंतची मुदत दिली होती.

दुसरीकडे इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची यांनीही इराणवर करण्यात येत असलेले हल्ले थांबवल्यास आमच्या देशालाही युद्धबंदी मान्य असल्याचं जाहीर केलं आहे. दोन आठवड्यांच्या कालावधीकरिता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांना सुरक्षितपणे ये-जा करू देणं शक्य असल्याचंही अरागची यांनी म्हटलं  आहे. इराणच्या सैन्य दलांसोबत समन्वयानं आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन ती खुली करण्यात येईल, असंही त्यांनी पुढे नमूद केलं.

या युद्धबंदीच्या प्रस्तावाच्या अगदी आदल्या दिवशी अध्यक्ष ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील संदेशात इराणची पूर्ण संस्कृतीच नष्ट होईल असे भीषण हल्ले करण्यात येतील असा इराणला अत्यंत कडक इशारा दिला होता.

ट्रम्प यांनी इराणमधील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा नष्ट करण्याचा दिलेला इशारा स्वीकारण्याजोगा नसल्याचं तसंच तो आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन करणारा असल्याचं पोप लिओ 14 वे यांनी म्हटलं आहे. पोप यांनी या युद्धाच्या विरोधात यापूर्वीही कठोर प्रतिक्रिया दिल्या असून अमेरिकी जनतेनं तसंच सर्वांचं भलं चिंतणाऱ्या इतर लोकांनी आपापल्या राजकीय नेत्यांकडे हे युद्ध नाकारण्याची मागणी करावी असं आवाहन केलं होतं.

दरम्यान ट्रम्प यांनी सशर्त युद्धबंदीचा प्रस्ताव जाहीर केल्यानंतर जगात कच्च्या तेलाच्या किंमती घसरल्या आहेत. ब्रेंट क्रूड 5 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांनी कमी होऊन त्याचे भावप्रती बॅरल 103 पूर्णांक 42 अमेरिकी डॉलर्सवर आले आहेत. तर अमेरिकेद्वारे केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाच्या व्यापारात हाच भाव साडेआठ टक्क्यांनी कमी होऊन प्रती बॅरल 103 पूर्णांक 25 डॉलरवर आला आहे.

## इराणमधील-भारतीय

इराणमधील वेगाने बदलत असलेली परिस्थिती तसंच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अगोदर दिलेल्या भीषण हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र मंत्रालयाने सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना, ते जिथे आहेत तिथेच थांबण्याचा, सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचा आणि अनावश्यक प्रवास टाळण्या बाबत, मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. तेहरानमधील भारतीय दूतावासाशी संपर्कात रहावं आणि दुतावासाकडून देण्यात येणाऱ्या सुचनांचं पालन कराव असंही सांगण्यात आलं होतं. नागरिकांनी सर्व विद्युत केंद्रं आणि लष्करी आस्थापनांपासून तसंच बहुमजली इमारतींच्या वरच्या मजल्यांपासून दूर राहण्याचे, महामार्गावरून प्रवास करण्याची गरज असल्यास आपल्या प्रवासाबाबत केवळ दूतावासाशीच समन्वय साधण्याचे आवाहन केलं होतं.

## संयुक्त-राष्ट्र

पश्चिम आशियातीस संघर्षाच्या पार्श्वभूमीवर रशिया आणि चीनने होर्मुझची सामुद्रधुनीतील तेलवाहतूक पुन्हा सुरु करण्यासंबंधीच्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावावर आपल्या नकाराधिकाराचा वापर केल्यानं हा ठराव नामंजूर झाला. 15 सदस्य असलेल्या या सुरक्षा परिषदेत बहारिनने मांडलेल्या या ठरावावर काल मतदान झालं, यामध्ये ठरावाच्या बाजूने 11 तर दोन देशांनी विरोधात मतदान केलं. दोन सदस्य तटस्थ राहिले.

## रिझर्व बँक आढावा

भारतीय रिझर्व्ह बँकेचा द्वैमासिक पतधोरण आढावा आज जाहीर करण्यात येणार आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीच्या 2026-27 या

आर्थिक वर्षातील पहिल्याच बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची गव्हर्नर संजय मल्होत्रा आज सकाळी 10 वाजता घोषणा करतील. रिझर्व बँकेच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यांच्या समितीच्या सोमवारी सुरू झालेल्या आढावा बैठकीत व्याजदर, चलन फुगवट्याच्या शक्यता तसंच आर्थिक वृद्धी दराचे अंदाज अशा महत्त्वाच्या आर्थिक पैलूंवर चर्चा करण्यात आली. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर चलनवाढीची शक्यता असल्यानं रेपोदरात कोणताही बदल न करता तो पूर्वीइतकाच सव्वा पाच टक्के ठेवला जाण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**जयशंकर बैठक**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज दुपारी नवी दिल्लीत बांगलादेशचे परराष्ट्र मंत्री खलिलुर रहमान यांच्यासमवेत बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. रहमान सध्या तीन दिवसांच्या भारत भेटीवर आले आहेत. या भेटीत खलिलुर रहमान राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल, पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू खात्याचे मंत्री हरदीपसिंग पुरी यांचीही भेट घेण्याची अपेक्षा आहे.

**मिस्त्री-अमेरिका**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आजपासून तीन दिवस अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. या भेटीत ते अमेरिकी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी व्यापार, संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसह अनेक व्यापक मुद्दयांसह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही चर्चा करणार आहेत. या भेटीच्या निमित्तानं भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांचा तसंच सध्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमधील उभयपक्षी सहकार्याचा विस्तृतपणे

आढावा घेण्याची संधी मिळणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**निवडणूक**

आसाम, केरलम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार, काल संध्याकाळी थंडावला. आसाममधील सर्व 126, केरलममधील 140 आणि पुद्दुचेरीमधील 30 विधानसभा मतदारसंघांसाठी उद्या एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडावी यासाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानापूर्वीच्या उपाययोजनांचा भाग म्हणून, संपूर्ण राज्यात 48 तासांची दारूबंदीही लागू करण्यात आली आहे. अशी माहिती आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिली. दरम्यान, काँग्रेस पक्षानं काल पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांसाठी आपला जाहीरनामा प्रकाशित केला. कोलकाता इथं आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्याच्या विकासाची दृष्टी आणि गती वाढवली जाईल असं आश्वासन दिलं.

**पोलिंग एजंट**

यंदा विविध राज्यांमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी पोलिंग एजंट अर्थात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीच्या व्यवस्थेसंदर्भात कोणतीही नवीन नियमावली जारी करण्यात आलेली नाही, असं केंद्रीय निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. मतदानाच्या दिवशी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रांमध्ये बसण्यास परवानगी दिली जाणार नसल्याच्या बातम्या काही माध्यमांतून प्रसृत करण्यात येत होत्या. त्यांची दखल घेऊन निवडणूक आयोगानं हा खुलासा केला आहे.

**ट्राय**

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात ट्रायनं ग्राहक संरक्षण नियमावलीचा तेरावा सुधारित मसुदा प्रसिद्ध केला आहे. इंटरनेटची आवश्यकता नसलेल्या ग्राहकांसाठी स्वस्त आणि केवळ व्हॉइस SMS प्लॅन उपलब्ध करून देणं, व्हॉइस, एसएमएस आणि डेटासह विशेष दरपत्रकांतर्गत काही बदल करणं या प्रस्तावाअंतर्गत अपेक्षित आहेत.

**नेमबाजी**

स्पेनमधील ग्रॅनाडा इथं सुरू असलेल्या ISSF विश्वचषक स्पर्धेत, भारतीय नेमबाज पलक गुलिया आणि मुकेश नेलावल्ली यांनी 10 मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात एका नवीन कनिष्ठ जागतिक विक्रमासह सुवर्णपदक पटकावलं. अंतिम फेरीत या जोडीनं 487 पूर्णांक 7 गुण मिळवले आणि, या वर्षाच्या सुरुवातीला नवी दिल्लीत झालेल्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत विक्रम त्यांनी मोडीत काढला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

## नमस्कार